**निशाणी ०५ वरील आदेश**

**( गणपत लक्ष्मण देसाई वि.सविता सदानंद देसाई व.)**

**सीएनआरनं.एमएचएसआय०४-०००३४६-२०२५**

प्रस्तुत अर्ज वादीतर्फे दिवाणी प्रकिया संहिता क्रम ३९ नियम १ व २ प्रमाणे तूर्तातूर्त मनाई ताकीद मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. वादी व प्रतिवादी तर्फे विद्वान विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला.

३. वादी व प्रतिवादी यांची कथने विचारात घेता, माझ्या समोर पुढील प्रमाणे मुद्दे उपस्थित होत आहेत. त्यांचे निष्कर्ष मी कारणमिमांसेसहित पुढील प्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीना सकृतदर्शनी केस असल्याचे दिसून येते का ? | **नाही** |
| २. | न्यायाचा समतोल वादीचे बाजुने आहे का ? | **नाही** |
| ३. | सदरचा अर्ज नामंजुर झालेस वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे का ? | **नाही** |
| ४. | आदेश काय ? | **वादीचा अर्ज नामंजूर करणेत येतो.** |

-::- **कारणमिमांसा** -::-

**मुद्दा क्र.१ करीता:-**

४. दावा प्रलंबित असताना तुर्तातुर्त ताकीदीची मागणी मंजुर करणे ही न्यायालयाच्या विवेकाधीन अनुतोषाशी निगडीत असणारी बाब आहे. असा न्यायालयीन विवेकाधीकार वापरताना खालील घटक पडताळून पाहणे आवश्यक असते. अ) वादींना सकृतदर्शनी केस आहे का ? ब) न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने आहे का? आणि क) अर्ज नाकारल्यास वादीचे अपरिमित नुकसान होईल का?

५. वादी यांच्या कथनाप्रमाणे दावा मिळकत सर्व्हे क्र.११९, हिस्सा क्र. ३ ही वादी व प्रतिवादी यांची कुळपणाची वडीलोपार्जित मिळकत असून सदर मिळकत अद्याप वादी व प्रतिवादी यांचे नावे झालेली नाही. तसेच दावा मिळकतीमध्ये असणारे वादी व प्रतिवादी यांचा हिस्सा अद्याप स्वतंत्र झालेला नाही. असे असताना प्रतिवादी यांनी दावा मिळकतीमध्ये वादी यांची कोणतीही पूर्व संमत्ती न घेता बांधकाम सुरू केले असल्याने वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज अभिलेखावर दाखल करून सदर बांधकामास तूर्तातूर्त मनाई आदेश पारीत करून स्थगिती देण्याची विनंती केलेली आहे. प्रतिवादी यांचे कथनानुसार त्यांनी दावा मिळकतीमध्ये कोणतेही बांधकाम केलेले नाही. याउलट, प्रतिवादी यांनी सर्व्हे क्र.८४ हिस्सा क्र.१ या मिळकतीमध्ये घरकुल योजनेअंतर्गत बांधकाम सुरू केले असून त्याबाबतचे हमीपत्र देखील प्रतिवादी यांनी योजना मंजूर होतेवेळी सादर केलेले आहे. तसेच सदर मिळकतीमधील प्रतिवादी यांनी सुरू केलेले बांधकाम आजरोजी पूर्ण झालेले असून घर मिळकत अस्तित्तवा आलेले आहे. त्यामुळे वादी यांचा प्रस्तुतचा अर्ज वस्तुस्थिती विपरित असल्याने तो नामंजूर करण्याची विनंती प्रतिवादी यांनी केलेली आहे.

६. अभिलेखावरील दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले असता, प्रतिवादी हे नेमके कोणत्या मिळकतीमध्ये व किती क्षेत्रामध्ये बांधकाम करत आहेत ही बाब वादी यांनी अभिलेखावर सबळ पुराव्याअंती आणली नसल्याचे दिसून येत आहे. तसेच प्रतिवादी यांचे कथनाप्रमाणे ते सर्व्हे क्र. ८४ हिस्सा क्र. १ या मिळकतीमध्ये बांधकाम करत असल्याची बाब वादी यांनी तोंडी अथवा कागदोपत्री पुराव्यांसह नाकारलेली नाही. तसेच प्रतिवादी यांनी अभिलेखावर सादर केलेले हमीपत्र व प्रतिवादी यांचे दावा मिळकतीमध्ये बांधकाम पूर्ण झाले असल्याची बाब देखील वादी यांनी नाकारलेली नाही. या सर्व बाबींचा एकत्रित विचार करता, प्रतिवादी हे दावा मिळकतीमध्ये बांधकाम करत असल्याची बाब वादी यांनी प्रथमदर्शनी पुराव्यासह सिध्द केली नसल्याचे दिसून येत आहे.

७. त्यामुळे वरील सर्व कारणांचा एकत्रित विचार करता दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी हे बांधकाम करत असल्याची बाब वादी यांनी ज्याअर्थी प्रथमदर्शनी पुराव्यासह शाबित केली नाही, त्याअर्थी मनाई सारखी नैसर्गिक दाद वादीच्या हक्कात देणे न्यायोचित होणार नसल्याचे दिसून येत आहे. जर मनाईसारखी नैसर्गिक दाद वादीच्या हक्कात दिली, तर प्रतिवादी यांचे अतोनात नुकसान होणार असल्याचे दिसून येत आहे. परंतु, जर मनाई सारखी नैसर्गिक दाद वादीच्या हक्कात दिली नाहीतर, वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे वादी यांनी प्रतिवादीविरुध्द दावा मिळकतीकरीता मनाईसारखी नैसर्गिक दाद देण्याकरीता सबळ पुरावा अभिलेखावर सादर न केल्याने वादी यांनी प्रथमदर्शनी केस शाबित केली नसल्याचे दिसुन येत आहे व त्यामुळे दावा मिळकतीबाबत मनाईसारखी दाद देणे संयुक्तिक नसल्याचे दिसुन येते. त्यामुळे मी मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष '***नकारार्थी***'असा नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. २ बाबत:</u>–**

८. मुद्दा क्र.१ बाबत दिलेल्या विवेचनावरुन न्यायाचा समतोल हा कोणाच्या बाजुने आहे याबाबत विचार करता असे दिसुन येते की, वादी यांनी प्रतिवादी हे दावा मिळकतीमध्ये बांधकाम करत असल्याबाबत कोणताही प्राथमिक पुरावा वादी यांनी अभिलेखावर सादर केला नसल्याचे दिसून येत आहे. वादी यांच्या कथनाप्रमाणे प्रतिवादी हे त्यांचे दावा मिळकतीमध्ये असणारे कब्जेवहिवाटीमधील असणाऱ्या मिळकतीमध्ये बांधकाम करत आहे. परंतु, प्रतिवादी यांनी अभिलेखावर सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी हे बांधकाम करत नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे वादी यांचे अधिकारांना बाधा पोहचु नये याकरीता मनाईसारखी नैसर्गिक दाद देण्याकरीता सबळ पुरावा वादी यांनी अभिलेखावर आणला नसल्याचे दिसुन येते. जर वादी म्हणतात त्याप्रमाणे मनाई सारखी नैसर्गिक दाद दावा

मिळकतीबाबत त्यांचे हक्कात न दिल्यास वादी यांचे अतोनात कशानेही न भरुन येणारे नुकसान होईल असे प्रथमदर्शनी दिसुन येत नाही. त्यामुळे मुद्दा क्र.१ बाबत दिलेल्या स्पष्टीकरणाचा तसेच वर नमुद कारणांचा विचार करता न्यायाचा समतोल हा वादीच्या बाजुने असल्याचे सिध्द करण्यास वादी प्रथमदर्शनी यशस्वी झालेले नाहीत. त्यामुळे सोयीचा समतोल हा वादीचे बाजुने असल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे सदरचा अर्ज दावा मिळकतीबाबत नामंजुर केल्यास निश्चितच वादीस अपाय होईल असे दिसुन येत नाही. याउलट जर वादीचा प्रस्तुतचा अर्ज मंजुर केला तर प्रतिवादीचे अतोनात कशानेही न भरुन येणारे नुकसान होईल असे प्रथमदर्शनी दिसुन येते. त्यामुळे न्यायाचा समतोल वादीच्या लाभात असल्याचे शाबित करण्यास वादीना यश आल्याचे दिसुन येत नाही. त्याकारणास्तव मुद्दा क्र.२ चा निष्कर्ष '***नकारार्थी***'असा नोंदविण्यात येत आहे.

**<u>मुद्दा क्र.३ करीता:–</u>**

९. कायद्यान्वये प्रत्येकास आपली मालमत्ता ही उपभोगण्याचा अधिकार आहे. तसेच त्याची कायदेशीरपणे विल्हेवाट लावण्याचाही अधिकार आहे. त्यामुळे एखाद्यास कोणत्याही प्रथमदर्शनी भक्कम कारणाव्यतिरिक्त त्याच्या सदर हक्कापासुन रोखुन ठेवणे हे संयुक्तीक होणार नाही. वादीने आपली केस ही प्रथमदर्शनी शाबीत केली नाही. त्याबाबत न्यायाचा समतोल हा वादीच्या बाजुने दिसुन येत नाही. त्यामुळे जर तुर्तातुर्त मनाई हुकुम हा वादीच्या हक्कात दावा मिळकतीबाबत मंजुर केला नाही तर निश्चितच वादीचे नुकसान होण्याची शक्यता ही दिसुन येत नाही. त्यामुळे वादीने दावा मिळकती बाबत तुर्तातुर्त मनाई हुकुम त्यांच्या बाजुने मंजुर न केल्यास त्यांचे अपरिमित नुकसान होणार असल्याचे शाबित केलेले नाही. सबब मुद्दा क्रमांक ३ चा निष्कर्ष '***नकारार्थी***' असा नोंदविण्यात येत आहे.

**<u>मुद्दा क्र.४ करीता–</u>**

**१०.** सकृतदर्शनी केस, न्यायाचा समतोल आणि अपरिमित नुकसान या तिन्ही संज्ञा केवळ अलंकारिक भाषेचा नमुना नसुन सदर तिन्ही संज्ञांना विशिष्ट महत्व आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये सदर तिन्ही संज्ञा अर्जदाराच्या लाभात असल्याचे शाबीत करण्यास त्यांना यश आलेले नाही. त्यामुळे मुद्दे क्र.१ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी असे नोंदविण्यात आलेले आहेत. त्यामुळे प्रस्तुतचा मनाई अर्ज नामंजुर होण्यास पात्र आहे. सबब मुददा क्र. ४ च्या उत्तरा दाखल खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

–::– **आदेश** –::–

अर्ज नामंजुर करण्यात येतो.

सही/–

( जी.ए.कुलकर्णी )

दिनांकः–१०.०२.२०२६. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), कुडाळ.